# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## परिपत्रक

### विद्यापीठ विभागातील सर्व प्रवेशित विद्यार्थ्यांकरीता

या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, राज्य/केंद्र शासनाच्या योजनांन्वये मिळणारे सर्व लाभ थेट लाभार्थ्यांच्या बॅक खात्यात जमा करण्याबाबतच्या योजनेनुसार लाभार्थ्यांना मिळणारे लाभ हे त्यांच्या आधारकार्डाशी निगडित असल्याने शासनाकडून बॅक खात्यावर जमा करण्यात येतात.

राज्य/केंद्र शासन पुरस्कृत योजनाद्वारे मिळणारी शिष्यवृत्तीची रक्कम ही लाभार्थ्यांच्या आधारकार्डाशी निगडित बॅक खात्यात जमा करण्यासाठी संबंधित लाभार्थ्यांनी आधारकार्डाची नोंदणी करून त्यास बॅक खाते जोडणे आवश्यक आहे. सोबत मा. शिक्षण संचालक, (उच्चशिक्षण) महाराष्ट्र राज्य यांचे परिपत्रक जोडत असून विद्यापीठ विभागात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी आपले आधारकार्ड काढावेत. जेणेकरून शासन पुरस्कृत योजनांचा लाभ मिळण्यास विद्यार्थ्यांना अडचण निर्माण होणार नाही.

गणेशखिंड, पुणे ४११ ००७. )
संदर्भ क्र. शै.प्रवेश/ 228 )
दिनांक : २२. ०१. २०१५ )

22/1/2015
सहा. कुलसचिव
शैक्षणिक प्रवेश विभाग

प्रतः मा. विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.

आपल्या विभागात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना आधारकार्ड काढण्यासाठी प्रेरित करून ते मिळण्यासाठी सहकार्य करावे.

01/01/2015
04

महाराष्ट्र शासन
सहसंचालक (उच्च शिक्षण)
१७ आंबेडकर रोड, कॅम्प, पुणे – ४११ ००१
Website : www.jdhepune.info E-mail – admin@jdhepune.info

दूरध्वनी क्रमांक – ०२० - २६१२७८३३, २६०५१६३२ फॅक्स क्र. ०२०- २६०५१६३२

जा.क्र. उशि/ससं/पुवि/२०१४-१५/शिष्यवृत्ती/पुणे विभाग/ दिनांक : २९.१२.२०१४

**परिपत्रक**

प्रति,

१. प्राचार्य,
सर्व अशासकीय कला, वाणिज्य,
विज्ञान, विधी व शिक्षणशास्त्र
महाविद्यालय पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा.

२. कुलसचिव,
पुणे विद्यापीठ, पुणे,
डेक्कन कॉलेज पदव्युत्तर व संशोधन संस्था, पुणे
गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स व इकोनॉमिक्स, पुणे
टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

मा. कुलसचिव
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे-७.
आवक क्र.-आर/ 3909
दिनांक- 24/12/2014
जावक दिनांक- 31/12/2014
विभाग- Academic/DirSW

**विषय – वैयक्तिक लाभांच्या योजनांन्वये मिळणारे लाभ थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यावर जमा करणेबाबत.**

संदर्भ - मा. शिक्षण संचालनालयाचे परिपत्रक क्र. शिसं / शिष्यवृत्ती / २०१४-१५ / १४ अई / १०८६४ दिनांक १९ डिसेंबर २०१४.

उपरोक्त विषयाच्या संदर्भीय पत्र, मा. शिक्षण संचालनालयाचे परित्रकानुसार कळविण्यात येते की राज्य / केंद्र शासनाच्या योजनान्वये मिळणारे लाभ थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा करण्याबाबतच्या योजनेनुसार लाभार्थ्यांना मिळणारे लाभ हे त्यांच्या आधार कार्डाशी निगडीत असलेल्या बँक खात्यावर जमा करण्याकरिता सर्व महाविद्यालयातील प्राचार्यांनी विद्यार्थ्यांना आधार कार्ड काढण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाशी संपर्क साधून आधार कार्ड बाबतचा कॅंप महाविद्यालयात आयोजित करावा व मार्गदर्शन करावे.

सर्व विद्यार्थ्यांना आधार कार्ड काढण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रेरित करुन ते मिळविण्यासाठी सहकार्य करावे. त्यानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

(डॉ.एस.एस शेटे)
सहसंचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग, पुणे १

स.कु.(डॉ.फुलेरे) / सोबत - संदर्भिय पत्र.
संचालक, विद्यार्थी कल्याण
31.12.14

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे - ४११००१.
Web : www.dhepune.gov.in E-mail : dhepune@yahoo.co.in
फोन नं. ०२०/२६१२६९३९ फॅक्स नं. ०२०/२६१११११५३

क्र. उशिसं/शिष्यवृत्ती/२०१४-१५/१४ अई/ 10864 दिनांक : 19 DEC 2014

परिपत्रक

**विषय : वैयक्तिक लाभांच्या योजनांन्वये मिळणारे लाभ थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यावर जमा करणेबाबत.**

सदर परिपत्रकान्वये कळविण्यात येते की, राज्य / केंद्र शासनाच्या योजनांन्वये मिळणारे लाभ थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा करण्याबाबतच्या योजनेनुसार लाभार्थ्यांना मिळणारे लाभ हे त्यांच्या आधार कार्डाशी निगडीत असलेल्या बँक खात्यावर जमा करावयाचे आहेत.

राज्य/केंद्र शासन पुरस्कृत योजनांद्वारे मिळणारी शिष्यवृत्तीची रक्कम ही लाभार्थ्यांच्या आधार कार्डाशी निगडीत बँक खात्यात जमा करण्यासाठी संबंधित लाभार्थ्याने आधार कार्डाची नोंदणी करून त्यास बँक खाते जोडणे आवश्यक आहे. याबाबत यापूर्वी आपणास कळविण्यात आलेले आहे.

सद्यस्थितीत आधारकार्ड बंधनकारक नसले तरी आधारकार्ड असल्यास विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वेळेत मिळण्यास मदत होईल. त्यामुळे याबाबत आपल्या विभागातील महाविद्यालयातील सर्व प्राचार्यांना याबाबत कळविण्यात यावे. महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांचे आधार कार्ड काढून घेण्याबाबत सूचना देऊन विद्यार्थ्यांचे आधार कार्ड क्रमांक तात्काळ प्राप्त करून घ्यावेत. विद्यार्थ्यांचे आधार कार्ड काढण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाशी संपर्क साधून आधार कार्ड बाबतचा कँप महाविद्यालयात ठेवण्याबाबत संबंधित प्राचार्यांनी तसेच आपल्या स्तरावरुन योग्य ती कार्यवाही करावी. व या कामास प्राधान्य देण्यात यावे तसेच राज्य किंवा केंद्रशासनाच्या शिष्यवृत्तीचे लाभ घेण्यासाठी आधारकार्ड नंबर नमूद केल्यास शिष्यवृत्ती मिळण्यास होणारा विलंब टाळून थेट लाभार्थ्यांच्या खात्यात शिष्यवृत्ती जमा होऊ शकते हे विद्यार्थ्यांना पटवून देण्यात यावे.

सबब सर्व विद्यार्थ्यांनी आधार कार्ड काढावे व ते मिळविण्यासाठी विद्यार्थ्यांना सर्वतोपरी सहकार्य करण्याची कार्यवाही व उपाययोजना करण्यात याव्यात व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या संचालनालयास सादर करावा.

(डॉ.प्र.रा.गायकवाड)
शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

प्रति,

१) विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण,
पुणे,मुंबई, जळगांव, औरंगाबाद, नांदेड, नागपूर, अमरावती,पनवेल,कोल्हापूर,सोलापूर.
२) कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे